E- ISSN 2582-5429

AMRJ

Akshara Multidisciplinary Research Journal

Peer-Reviewed & Refereed International Research Journal

April-June 2021 Vol.02 Issue V SJIF Impact- 5.54

24

# पत्रात्मक साहित्य: मानवी मनाचा उत्कटाविष्कार

**डॉ. सचिन रूपनर**
पुणे ९४२०९५५८२२
sachinrupnar@gmail.com

**डॉ. पांडुरंग भोसले**
विभाग प्रमुख, एस.एम.जोशी कॉलेज, हडपसर,
पुणे

मानवाला आपला दैनंदिन व्यवहार करण्यासाठी या ना त्या कारणाने भाषेची मदत घ्यावी लागते. मानवाच्या प्रगतीत भाषेचा सर्वात मोठा वाटा आहे. आपल्या मनातील हर्ष, खेद, राग, लोभ, दुःख, तिरस्कार, संताप, मान, अपमान व्यक्त करण्यासाठी मानवाला भाषेचे माध्यम म्हणून सहाय्य घ्यावे लागते. पण हे झाले एक व्यक्ती दुसऱ्यासमोर असताना पण दूरध्वनीची, संगणकाची सोय उपलब्ध होण्यापूर्वी परगावातील, परप्रांतातील अथवा आपल्यापासून दूर अंतरावर असणाऱ्या व्यक्तीला आपल्या भाव–भावना, विचार कळविण्यासाठी 'पत्र' या माध्यमाचा वापर फार मोठ्या प्रमाणात केला जाई.

'पत्र'या माध्यमाद्वारे एक व्यक्ती दुसऱ्यांशी संवाद साधून आपले क्षेमकुशल कळविते, त्याचे जाणून घेते. आपल्यापासून दूर अंतरावर असणाऱ्या व्यक्तींची विचारपूस करणे, त्याला शुभेच्छा देणे, सांत्वन करणे, आभार मानणे, मार्गदर्शन करणे , उपदेश करणे, सल्ला मसलत करणे, विचार–विनिमय करणे इत्यादी हेतू साध्य करत असते. पत्रातून एखाद्याला एखाद्या व्यक्तीबद्दल वाटणारी चिंता त्या व्यक्तीबद्दल त्याच्या मनात असणाऱ्या निरनिराळ्या भावना तळमळ व्यक्त होऊन आपलेपणा वाढत जातो. पत्राद्वारे इतरांशी हितगुज करून मानव आपले हितसंबंध जपत असतो. एकमेकांमधील सलगी वाढवत असतो.

पत्रात्मक साहित्याच्या स्वरूपाचा विचार करण्यापूर्वी सर्वप्रथम 'पत्र' या शब्दाचा अर्थ पाहणे आवश्यक ठरते. "प्रत्यक्षात बोलून जे काही एकमेकांना कळविता येत नाही ते लिखित स्वरूपात कळविण्याचा प्रकार म्हणजेच 'पत्रलेखन.''१ इलेक्ट्रॉनिक माध्यमांच्या उपलब्धिपूर्वी व्यक्ती एकमेकांना पत्र पाठवून आपली खुशाली, इकडील वार्ता, एखादी विशेष घटना कळवत असे. त्याचबरोबर त्याची विचारपूसही करीत असे. पूर्वी पत्राद्वारेच लहानांपासून ते वृध्दांपर्यंत सर्वच व्यक्ती आपल्यापासून लांब अंतरावर असणाऱ्या व्यक्तींशी संवाद साधत. हा संवाद घडविण्याचे पत्र हे अत्यंत सोपे माध्यम उपलब्ध होते. "दूर अंतरावर असलेल्या व्यक्तींशी, संस्थांशी संवाद साधण्याच्या हेतूने लिखित लिपीचा वापर केला जातो. त्याला पत्रलेखन असे म्हणतात."२

असे हे पत्रलेखनाचे माध्यम सहज साध्य असून सर्वांच्या अंकित होते. सर्वचजण पत्रलेखनाचा सहजासहजो वापर करत असत. अशा या पत्राच्या स्वरूपाचे वर्णन प्रसिध्द तत्ववेत्ता रॅल्फ वल्डो एमरसनने आपल्या शब्दात केले आहे. त्याचा अनुवाद असा– तुम्ही जे पत्र किंवा चिठ्ठी लिहिता त्यात तुमचा एक काहीतरी खास तुम्हीपणा असतो. ते पत्र किंवा चिठ्ठी म्हणजे, "तुझ्याविषयी मला जे वाटते ते बसून शब्दांनी व्यक्त करण्याचा त्रास घेण्याइतका तुझा विचार माझ्या मनात घोळत असतो."३असं हे पत्र सर्वप्रथम कोणी, कोणाला, कोठे, केव्हा लिहिले याचा संदर्भ मिळत नसलातरी त्याबद्दल काहीएक अंदाज वर्तविता येतो. जेव्हापासून भाषेला लिखित रूप मिळाले व मानव आपलाविचार लेखन स्वरूपात व्यक्त करू लागला. तेव्हापासून पत्रलेखनास आरंभ झाला असावा. असा पत्राचा इतिहास या पत्रात रुक्मिणीनं श्रीकृष्णाला आपल्याला पळवून नेण्याची विनंती केली आहे. हे पत्र ती ब्राम्हणाकडून कृष्णाला पाठवते. असेच आणखी एक शकुंतलेचे पत्र सापडते. हे पत्र शकुंतलेने आपला प्रियकर दुष्यंताला लिहिले आहे. ते पत्र कमलपत्रावर लिहिले असून त्याचा उल्लेख प्रणयपत्र असा केला जातो. कालिदास त्याचा उल्लेख मदनलेख असा करतो.

### ०१) पत्रात्मक साहित्याचे स्वरूप:

पत्रात्मक साहित्यातील कोणत्याही कलाकृतीने पत्र या रूपबंधाचे रूप धारण केलेले असते. त्यात पात्र वाचकांशी वैयक्तिक पातळीवर संवाद साधत आहे असा भास निर्माण केलेला असतो. पत्रात्मक कादंबरीत एकाद व्यक्तीने एक किंवा अनेक व्यक्तींना लिहिलेली पत्रे समाविष्ट केलेली असतात. पत्र हा एकमेव लेखनबंध किंवा निवेदनप्रकार तिथे योजिलेला असतो.''४ अशा या पत्रातून पात्रांचे विविध विचार, भावभावनांच्या प्रकटीकरणाबरोबरच प्रसंगचित्रण,



Scanned by CamScanner

MAHATMA PHULE MAHAVIDYALAYA PIMPRI,PUNE-17